CMYK

शिंदेंनी मोहन भागवत यांना विचाराव ते कुंभमेळ्याला का गेले नाहीत
>> पान 2

वासना कांड चुकीच्या पद्धतीने चालू आहे
>> पान 3

घटनांवरुन गृह खात्याच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह
>> पान 4

**सुविचार**

शाळा असलेल्या प्रत्येक छात्राला संस्कार, शिक्षा आणि स्वावलंबनाची आधारभूत साक्षरता मिळते


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 201 ■ सोमवार, दि. 03 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




इमरान हश्मीसोबत KISSING सीनमुळे आली होती चर्चेत, आज स्टार क्रिकेटरची पत्नी

आतील पान

# राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनास आज प्रारंभ

## महिला सुरक्षेचा मुद्दा गाजणार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्राचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवार ३ मार्चपासून सुरू होणार आहे. या अधिवेशनात १० मार्च रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार राज्याचा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करतील. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून अर्थसंकल्पावर चर्चा सुरू होईल. याआधी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राज्यपालांचे अभिभाषण होईल. राज्यपालांच्या अभिभाषणावर दोन दिवस चर्चा होणार आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात निवडक पुरवणी मागण्या मांडल्या जाणार आहेत.**

विधानसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचे सरकार आले. केंद्र सरकारचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर आता महाराष्ट्राचा अर्थसंकल्प सादर होणार आहे. या अर्थसंकल्पात मोठ्या घोषणा होण्याची शक्यता आहे. अधिवेशनात ८ मार्च रोजी महिला दिननिमित्त महिलांच्या प्रश्नांवर विशेष चर्चा करणार आहेत. तर २५ आणि २६ मार्च रोजी देशाच्या राज्यघेटनेचा अमृत महोत्सव असल्यामुळे संविधानावर दोन दिवस चर्चा केली जाणार आहे. राज्याची कायदा – सुव्यवस्था, महिला सुरक्षा, शेतकऱ्यांची कर्जमाफी, सोयाबीन आणि कापूस खरेदी तसेच पीक विमा, महाराष्ट्र – कर्नाटक सीमेवरील तणाव हे मुद्दे अर्थसंकल्पीय अधिवेशनात गाजण्याची शक्यता आहे.



सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्या संपर्कातील वाल्मीक कराडला अटक झाली आहे. धनंजय मुंडेंच्या कार्यकाळात कृषी साहित्य आणि खते, बी – बियाणे यांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारांत भ्रष्टाचार झाल्याचे आरोप त्यांचे राजकीय विरोधक करत आहेत. या प्रकरणामुळे धनंजय मुंडे राजकीयदृष्ट्या अडचणीत सापडण्याची शक्यता आहे.

पुण्याच्या स्वारगेट एसटी डेपोत तरुणीवर बलात्कार झाल्याची तक्रार पोलिसांकडे आली आहे. या प्रकरणाचा तपास अद्याप सुरू आहे. तर जळगाव जिल्ह्यात एका मंत्र्याच्या मुलीची छेड काढण्याचा प्रकार घडल्याचे वृत्त आहे. यामुळे अधिवेशनात राज्याची कायदा – सुव्यवस्था, महिला सुरक्षा या मुद्यावरुन विरोधक गदारोळ करण्याची शक्यता आहे.

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना बनावट कागदपत्रे सादर करुन शासकीय योजनेत सदनिका लाटल्याप्रकरणी न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा दिली आहे. या शिक्षेविरोधात कृषीमंत्र्यांनी न्यायालयाकडे दाद मागितली आहे. या प्रकरणी सुनावणी व्हायची आहे. पण या निमित्ताने विरोधक कृषीमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्याची शक्यता आहे.

महायुतीने निवडणुकीत प्रचार करताना लाडकी बहीण योजनेत दरमहा १५०० ऐवजी २१०० रुपये देण्याची घोषणा केली आहे. ही घोषणा एप्रिलपासून अंमलात आणण्याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशनातून घोषणा होण्याची शक्यता आहे.

## विरोधी पक्षनेते पदासाठी ठाकरेंची शिवसेना आग्रही

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या राजकारणात विधानसभेच्या विरोधी पक्षनेते पदावरुन वाद सुरू होण्याच्या शक्यता वर्तवली जात आहे. विरोधी पक्ष नेते पदावरुन महाविकास आघाडीमध्ये उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेनं (उबाठा) विरोधी पक्षनेतेपदासाठी दावा केला.

शिवसेनेनं (उबाठा) विरोधी पक्षनेतपदासाठी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना पत्र लिहिण्याचा निर्णय घेतलाय. त्या संदर्भात आज (२ मार्च) विधान परिषदेची विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या शासकीय निवासस्थानी महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक होणार असल्याची माहिती मिळत आहे. या बैठकीनंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना विरोधी पक्षनेता निवडीबाबतचे पत्र दिलं जाणार असल्याची माहिती आहे.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीनं ऐतिहासिक विजय मिळवला. तर, निवडणूक काळात सत्ता स्थापनेचा दावा करणाऱ्या महाविकास आघाडीला विरोधी पक्षनेते पद मिळवण्याइतकंदेखील संख्याबळ गाठता आलं नाही. यात शिवसेनेला (उबाठा) २०, काँग्रेसला १६ आणि राष्ट्रवादीला (शरदचंद्र पवार) १० जागा मिळाल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) आणि काँग्रेसच्या तुलनेत शिवसेनेला (उबाठा) अधिक जागा मिळाल्यानं शिवसेना (उबाठा) विरोधी पक्षनेते पदावर दावा करणार असल्याची माहिती मिळत आहे.

## राजकीय व्यक्ती असेल तर भरचौकात आणून फाशी द्यावी

### खडसेंच्या लेकीच्या छेडछाडीवरून नवनीत राणा भडकल्या



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीसह काही मुलींची मुक्ताईनगर तालुक्यातील कोथळी गावातील संत मुक्ताई यात्रेमध्ये टवाळखोरांनी छेडछाड केल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला. या प्रकरणातील टवाळखोर एका पक्षाचे कार्यकर्ते असल्याची माहिती समोर आली आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील या प्रकरणात विशिष्ट पक्षाचे कार्यकर्ते असल्याचे म्हटले आहे. आता छेडछाड प्रकरणावरून अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.


नवनीत राणा म्हणाल्या की, रक्षाताई खडसे यांच्या मुलीसोबत छेडछाड झाली, व्हिडीओ बनवला, राज्याचे मुख्यमंत्री हे सक्षम आहेत. मुलगी कोणाची ही असो जर असे प्रकार झाले तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे आणि आमचं सरकार कारवाई करण्यामध्ये सक्षम आहे. दुःख या गोष्टीचं वाटत आहे की, ते एका पक्षाचे कार्यकर्ते आहेत.

तुम्ही राजकारण कोणत्याही पातळीवर न्या. पण असे प्रकार करू नका, हाथ जोडून विनंती करते. राजकारण गेलं खड्ड्यात, जर कोणी राजकीय व्यक्ती असं करत असेल तर भरचौकात आणून त्यांना फाशी द्यावी. जर राजकीय व्यक्ती असे करत असतील तर हे खूप निंदनीय गोष्ट आहे. आमचे गृहमंत्री कडक कारवाई करणार आहेत. मुलगी कोणाचीही असो. ती राज्यात सुरक्षित आहे आणि सुरक्षित राहणार, अशी संतप्त प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

# केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसेंच्या मुलीसोबत टवाळखोरांकडून छेडछाड

■ महिलांच्या छेडछाडीच्या घटनेचा आलेख वाढला : गृह खात्याच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह

■ एकामागे एक घटना घडत असल्याने महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न एरणीवर




**दैनिक आपला विदर्भ**

**जळगाव/प्रतिनिधी : महाशिवरात्रीनिमित्त मुक्ताईनगरमध्ये आदिशक्ती मुक्ताबाई ची यात्रा भरते. या यात्रेमध्ये फिरण्यासाठी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांची कन्या कृषिका ही यात्रेत गेली होती. यादरम्यान काही टवाळखोर मुलांनी तिचा पाठलाग केला आणि तिच्याबरोबर व्हिडिओ काढले, याबाबत शंका येतात सुरक्षारक्षकाने त्याच्या हातातील मोबाईल घेतला. परंतु सुरक्षा रक्षकाबरोबर त्यांनी अरेरावी केली, या आधी देखील याच मुलांनी रक्षा खडसे यांच्या मुलीचा पाठलाग केल्याचे लक्षात आले म्हणून केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे आज गुन्हा नोंदवण्यासाठी मुक्ताईनगर येथील पोलीस ठाण्यामध्ये दाखल झाले आहेत. सदर घटनेने संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला असून या घटनेबाबत विविध स्तरातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.**

आदिशक्ती मुक्ताबाई ची यात्रा ही महाशिवरात्री निमित्त भरते. या दिवशी कार्यक्रम असतो, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांची कन्या कृषिका ही फराळ वाटप करत होती. यावेळी देखील भोई नावाचा तरुण तिचा पाठलाग करत होता, त्यानंतर कृषिका काही यात्रेमध्ये सायंकाळच्या वेळेस मैत्रिणी बरोबर फिरायला गेली.यावेळी देखील हाच तरुण टवाळखोरांना घेऊन तिच्या पाठीमागे लागला ते ज्या पाळण्यामध्ये बसत होती. त्या पाळण्यामध्ये सुद्धा तो बसला व्हिडिओ चित्रित केले. ही बाब सुरक्षा रक्षकाच्या लक्षात येताच त्यांनी त्याला मज्जाव केला. परंतु, तो त्याच्या अंगावरती गेला, या कारणास्तव मुलीच्या सुरक्षिततेसाठी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे या आज मुक्ताईनगर येथील पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाले आहेत.या तरुणांवरती गुन्हा दाखल करण्यासाठी त्यांनी केली आहे.यावेळी माध्यमांशी बोलताना बोलताना केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे म्हणाले की, आज एका मंत्र्याची खासदाराची मुलगी सुरक्षित नसेल तर सर्वसामान्य मुलींचे काय याबाबत मी मुख्यमंत्र्यांची ही चर्चा केली आहे. असे त्यांनी सांगितले. तसेच सदर घटनेबाबत विविध स्तरातून संताप व्यक्त केला जात असून विविध मान्यवरांनी प्रतिक्रिया देत सदर घटनेचा निषेध केला आहे. याबाबत गृह खाते हे निष्क्रिय असल्याने अशा घटना घडत असल्याचे आरोप केला असून पोलिसांचे प्रत्येक ठिकाणी असलेले अर्थपूर्ण संबंध हे अशा घटनेस कारणीभूत ठरत असल्याचा आरोपही सर्व स्तरातून होत आहे.

## छेडणारे एका विशिष्ट पक्षाचे : मुख्यमंत्री



खडसे यांच्या नातीला छेडणारे एका विशिष्ट पक्षाचे आहेत. असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे. मात्र, एकच खळबळ निर्माण झाली आहे. त्यांना रक्षा खडसे यांच्या मुलीच्या छेडछाडीबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी वेगळाच संशय व्यक्त केला. आरोपींना माफी देता कामा नये. त्यांच्यावर कडक कारवाई होणारच. खडसेंच्या नातीला छेडणारे एका विशिष्ट पक्षाचे आहेत, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. दुर्दैवाने त्यात एका विशिष्ट पक्षाचे पदाधिकारी आहेत. ज्यांनी अतिशय वाईट काम केलेले आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. काहींना अटक केली आहे. इतरांनाही अटक केली जाईल. पण अशाप्रकारे छेड काढणे, त्रास देणे हे अतिशय चुकीचे आहे. कोणत्याही परिस्थितीत अशा लोकांना माफी देता कामा नये. त्यांच्यावर अतिशय कडक कारवाई होईल, असेही देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.

## आरोपींना तत्काळ अटक केली जाईल : डीवायएसपी

मुक्ताईनगर शहरालगत असणाऱ्या कोथळी या गावी आदिशक्ती मुक्ताईची यात्रा भरते. या यात्रेमध्ये काही मुली फिरण्यासाठी गेले असतात. पाळण्यात बसले असता मुक्ताईनगर मधील अनिकेत भोई, सोहम भोई, अनुस पाटील, पियुष मोरे, किरण माळी, सचिन पालवे यांनी मुलींचा पाठलाग करून पाळण्यामध्ये बसले त्यांचे फोटो व्हिडीओ काढले.यासंदर्भात मुक्ताईनगर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल आहे. अशी माहिती मुक्ताईनगर चे डीवायएसपी यांनी दिली आहे.स्वतः केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे या पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यासाठी गेल्या होत्या. त्या अनुषंगाने मुक्ताईनगर पोलीस स्टेशनला पोस्को कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सध्या आरोपींना अटक झालेली नसून तत्काळ त्यांना अटक करण्यात येणार असल्याची माहिती मुक्तानगरचे डीवायएसपी यांनी दिली आहे.

## तालुक्यात गेल्या चार-पाच वर्षात गुंडगिरी वाढली : एकनाथ खडसे

मुक्ताईनगर तालुक्यात गेल्या चार-पाच वर्षात गुंडगिरी वाढली आहे.त्यामुळे महिला सुरक्षित झालेल्या आहेत.अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी व्यक्त करत गृह खात्यावर नाराजी व्यक्त केली.तसेच मुक्ताईनगर मधील यात्रेत घडलेला प्रकार हा अत्यंत निंदनीय आहे. हे टवाळखोर नसून तर ते गुंड आहेत.त्यांच्या विरोधात आधी सुद्धा काही गुन्हे दाखल आहेत.या मुली ज्यावेळेस यात्रेत हजर होत्या. त्यावेळेस पोलीसही तिथे हजर होते, पोलिसांनी त्या गुंडांना अडवण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्या गुंडांनी पोलिसांनाच मारहाण केली. पोलिसांना शिवीगाळ ही केली. त्या पोलिसांनी या गुंडांवर ३५३ चा गुन्हा देखील दाखल केलेला आहे, हा एक प्रश्न निव्वळ माझ्या घरामध्ये घडला असा नाही, हा एक सामाजिक प्रश्न आहे.महाराष्ट्रामध्ये अशा अनेक घटना घडत आहेत. अनेक घटनांची नोंद होत नाही, किंवा महिला त्या ठिकाणी तक्रार करायला पुढे येत नाहीत, तक्रार न झाल्यामुळे अशी प्रकरण उघडकीस येत नाहीत, या ठिकाणी जो प्रकार घडला. यासाठी रक्षा खडसेंची मुलगी स्वतः तक्रार करायला पुढे आली आहे. अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी ज्येष्ठ नेते आमदार एकनाथ खडसे यांनी दिली आहे. मुक्ताईनगर मतदारसंघांमध्ये गेल्या चार-पाच वर्षात जी गुंडगिरी वाढली आहे. या गुंडगिरी विषयी मी अनेक वेळा विधान परिषदेमध्ये वारंवार आवाज उठवला. परंतु, याकडे लक्ष दिले गेले नाही. अशीही असे मत राष्ट्रवादी ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी दिली आहे.



## महिलांना सुरक्षा देण्यासाठी गृह खाते अपयशी ठरले : रोहिणी खडसे



महाराष्ट्रातल्या महिलांचा सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आल्याचे आपल्याला बघायला मिळत आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये महिला अत्याचाराच्या घटना या वाढलेल्या दिसत आहेत. केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांची कन्या व माझी भाची तिच्याबरोबर छेडखानीचा प्रकार दोन दिवसापूर्वी मुक्ताईनगर शहरा लगत असलेल्या कोथळी या गावी यात्रेत घडला होता. केंद्रीय मंत्र्यांच्या मुली बरोबर असला प्रकार घडत असेल तर, महाराष्ट्रातल्या सर्वसामान्य महिलांना न्याय कसा मिळणार असे प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या महिलाच प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी दिली आहे. केंद्रीय मंत्र्यांना स्वतःच्या मुलीसाठी पोलीस स्टेशनमध्ये हजर राहून तक्रार द्यावी लागत आहे. यामुळे आता सिद्ध होते की, महाराष्ट्रातील गृह खाते हे महिलांना सुरक्षा देण्यासाठी अपयशी ठरला आहे.दोन दिवसापूर्वी गुन्हा नोंदवून सुद्धा या टवाळखोरांवर साधी कारवाई देखील करण्यात आली नाही, माझा गृहमंत्री यांना एकच सवाल आहे. अशी प्रतिक्रिया शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस गटाच्या महिलाच प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी दिली.

CMYK

# शिंदेंनी मोहन भागवत यांना विचाराव ते कुंभमेळ्याला का गेले नाहीत

## संजय राऊत यांचा उपरोधित प्रश्न

**मुंबई/प्रतिनिधी :** एकनाथ शिंदे यांना भारतीय जनता पक्षाने किंवा अमित शहा यांनी कुठली ट्रेनिंग स्कूल असेल तर, त्याला हिंदुत्व संदर्भात ट्रेनिंग देऊन बोलायला शिकवायला पाहिजे. तसेच चिन्ह मोहन भागवत यांना आधी विचारावे ते कुंभमेळ्याला का गेले नाहीत, असा प्रश्न शिवसेना नेते संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना उपस्थित केला.

यावेळी ते बोलताना म्हणाले की, भ्रष्ट मंत्र्यांच्या टोळीला किंवा आमदारांना घेऊन आंघोळ घातली. कोणता साबण नेला होता मला माहित नाही. कोणाकडून साबण घेऊन गेले अमित शहा यांनी कोणता साबण तयार केला आहे. उद्धव ठाकरे कुंभमेळ्याला का गेले नाही त्यांना ते जर हिंदू असेल तर त्याने कुंभमेळ्याला जायला पाहिजे, कुंभमेळ्याला गेल्यामुळे हिंदुत्व बळकट होते असे मला वाटत नाही. आमचे अनेक सहकारी जाऊन आले सुनील राऊत स्वतः माझे भाऊ जाऊन आले. माझा प्रश्न एकनाथ शिंदे यांना असा आहे जर उद्धव ठाकरे कुंभमेळ्याला ला गेले नाही म्हणून त्यांच हिंदुत्व हे संशयात तुम्ही टाकत असाल तर आपण कुंभमेळ्याला का घेत नाही असा प्रश्न एकनाथ शिंदे यांनी संघाचालक मोहन भागवत यांना देखील विचारायला पाहिजे, मोहन भागवत यांचा कुठला व्हिडिओ पाहिला नाही ते कुंभ ला गेले आणि स्नान करत आहेत. संघाचे इतर



नेते प्रमुख त्यांचे प्रमुख नेते आहेत. सहकारी असतील मी कोणालाही पाहिलं नाही ते तिकडे जाऊन आंघोळ करत आहेत आणि पुन्हा प्राप्त करत आहेत. अशा प्रकारचे पूर्ण प्राप्ती वर त्यांच्या विश्र्वास नसावा, मोहन भागवत गेले नाही आणि मोहन भागवत यांना फॉलो करतो. बाकी नकली हिंदुत्व आहे. आमच्यासाठी मोहन भागवत सहसंघ चालक मोहन भागवत गेले आंघोळीला तर त्याच्या पाठोपात आपण आपल्या शाही स्नानाचा कार्यक्रम करायचा, पण भागवतच गेले नाही. देवेंद्र फडणवीस गेले एकनाथ शिंदे गेले यांच्या मागे आम्ही जायचं का? आमच्यासाठी मोहन भागवत आदर्श पुरुष आहेत हिंदुत्वाचे मी माझ्या संपूर्ण आयुष्यात हेगडेवार ,बाळासाहेब देवरत, रजू भैया, सुदर्शन जी या कोणाचेही कुंभमेळ्यात जाऊन स्नान करताना चे छायाचित्र आम्हाला आलेले नाही. मोहनव भागवत सरसंघ चालक हे प्रयागराजला जात नाहीत, स्नान करत नाही तोपर्यंत आपण थांबलं पाहिजे, ते गेले नाही त्यामुळे आमचा कार्यक्रम झाला नाही, हे मी तुमच्या माजी मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो आता आम्हाला प्रश्न विचारलात तोच घेऊन नागपूरला एक पत्रकार परिषद घ्या आणि सरसंघ चालक यांना विचारा, भागवत साहेब आपण कुंभ का गेले नाही. हा खरा संवाद आहे. पहाटे चार वाजता एक अस्वस्थ आत्मा त्याच्या पक्षाच्या प्रमुखांना भेटतात अमित शहा यांना भेटतात. तो पहिली तक्रार देवेंद्र फडणवीस यांची करेल हे तुम्ही मान्य केले पाहिजे. की मला कसा त्रास होतो माझी कशी कोंडी केली जाते माझे कसे अधिकार काढून घेतले जात आहेत. माझ्या बरोबरच्या मंत्र्यांची चौकशी लावला आहेत ते असं म्हणत आहेत तुमच्यावर विश्र्वास ठेवून आम्ही आलो आता आम्ही काय करायचे. हा संवाद झाला आहे हे देवेंद्र फडणवीस यांना देखील माहिती आहे. भ्रष्टाचार प्रकारणी येतात आजच साडे तीन हजार कोटींचा आरोग्य खात्याचा जुना सगळा व्यवहार आला त्याला देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिली आहे. तानाजी सावंत हे लाडके आरोग्य मंत्री होते आणि ज्यांनी उद्धव ठाकरे यांच सरकार पाडण्यासाठी ४ हजार बैठका घेतल्या होत्या. त्यांना बहुतेक लादीवर बसवण्याचं काम चाललेला आहे हे दिसत आहे. आज ठाण्यामध्ये आम्ही चाललो आहे सर्व नेते. साधारण पाच वाजता ठाण्यामध्ये असू, शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीसाठी महाराष्ट्रात नेत्यांनी फिरावा असं पक्षप्रमुखांची आहे तो आदेश पाळून आम्ही ठाण्यापासून सुरुवात करतोय त्यानंतर आम्ही मीरा भाईंदर नंतर नवी मुंबईत जाऊ पालघरला जाऊ, धनंजय मुंडे पदाचा राजीनामा करुणा मुंडे ट्विट हा त्यांच्या पक्षाचा अंतर्गत विषय आहे, राजीनामा तर द्यावाच लागेल कारण त्यांच्या जवळच्या माणसाचा संतोष देशमुख खून प्रकरणातील सूत्रधार मास्टर माईंड असल्याचा आरोपातला सांगण्यात आले आहे. लोक म्हणतात वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडे एकाच नाण्याच्या दोन बाजू, त्याच्यामुळे नैतिकतेच्या दृष्टिकोनातून त्यांचा राजीनामा मुख्यमंत्र्यांनी घेतला असेत तर, त्याचे विधिमंडळात नक्कीच पडसाद उमटतील. मी काही विधिमंडळात नाही मी विधानसभेत नाही किंवा विधान परिषदेत नाही, आमचे जे नेते आहेत दोन्ही सभागृहातले तुम्ही त्यांच्याशी या विषयावर आज संवाद साधा. शंभर टक्के दावा सांगणार आहे, शिवसेनेकडे वीस चा आकडा आहे आणि जे सहकारी आहेत काँग्रेस राष्ट्रवादी आम्ही निवडणुका एकत्र लढलो. आम्ही निवडणुका वेगळ्या लढलो आणि एकत्र आलो असे नाही किंवा आम्ही एकत्र आहोत. त्याच्यामुळे आम्ही साधारण ५० च्या पुढे आमचा आकडा आहे आणि घटनेनुसार विरोधी पक्षनेते पद आम्हाला मिळाले पाहिजे. निर्णय झालेला आहे. उद्धव ठाकरे उद्यापासून विधिमंडळात आहेत तुम्ही त्यांच्याशी संवाद साधू शकता, असे खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे दिव्यांग व्यक्तींसाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन

**दैनिक आपला विदर्भ**

**कल्याण/प्रतिनिधी :** दिव्यांग व्यक्तींना योग्य संधी मिळाली तर ते प्रत्येक क्षेत्रात अधिक यशस्वी होऊ शकतील असे प्रतिपादन महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांनी आज केले. महापालिकेच्या समाज कल्याण विभागामार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी नानासाहेब फडके क्रीडा संकुल, लालचौकी कल्याण (प) येथे आयोजिलेल्या क्रीडा स्पर्धांचे उद्घाटनसमयी बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले.

महापालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षण करण्यात येणार असून, त्यामुळे प्रवाहाबाहेर असलेल्या इतर दिव्यांगांनाही प्रवाहामध्ये आणता येईल. शासनाच्या काही योजनांमध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव कोटा ठेवण्यात आलेला आहे अशी ही माहिती आयुक्त डॉ. इंदु राणी





जाखड यांनी यावेळी बोलताना दिली. यावेळी आयुक्तांनी स्वतः या क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या अंध दिव्यांग महिलेबरोबर बुद्धिबळ खेळून सदर अंध महिलेचे खेळातील कौशल्य पाहून तिचे कौतुक केले.

समाज कल्याण विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनीही अंध बांधवा बरोबर कॅरम या खेळामध्ये सहभागी होऊन खेळाचा आनंद लुटला. महापालिकेतर्फे दिव्यांग व्यक्तींसाठी अनेक योजनांच्या माध्यमातून सोयी सुविधा पुरविण्यात येत असून, दिव्यांग व्यक्तींना सुविधा पुरवण्यासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध आहे असे उद्गार समाज कल्याण विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी यावेळी आपल्या भाषणात काढले. दिव्यांग व्यक्तींसाठी महापालिकेने आयोजिलेल्या या क्रीडा स्पर्धांबाबत दिव्यांग महासंघाचे अध्यक्ष अशोक भोईर यांनी महापालिका प्रशासनाचे कौतुक केले.

दिव्यांग व्यक्तींसाठी आयोजिलेल्या या क्रीडा स्पर्धांमध्ये बुद्धिबळ, कॅरम अशा बैठ्या खेळांचा अंतर्भाव असून, मैदानी क्रीडा स्पर्धांमध्ये गोळा फेक, नेमबाजी, व्हीलचेअर स्पर्धा, धावणे इ. स्पर्धांचा अंतर्भाव होता. या विविध स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभागी होऊन दिव्यांग बांधवांनी स्पर्धांचा आनंद लुटला. यावेळी माजी नगरसेवक मोहन उगले, क प्रभागाचे सहा आयुक्त धनंजय थोरात, समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर तसेच सुमारे २५० दिव्यांग बांधव /भगिनी उपस्थित होत्या.

## इमरान हश्मीसोबत KISSING सीनमुळे आली होती चर्चेत, आज स्टार क्रिकेटरची पत्नी

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय संघातील अनेक क्रिकेटपटूंनी बॉलिवूड अभिनेत्रींशी लग्न केले आहे. लग्नानंतर काही अभिनेत्रींनी आपलं करिअर सोडलं आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या स्वीकारल्या. अशीच एक अभिनेत्री जिने बॉलिवूडमध्ये आपली ओळख निर्माण करण्यासाठी खूप मेहनत घेतली, इमरान हश्मीसोबत काम केलं. भरभरून इंटिमेट सीन्स दिले. अखेर करिअरसाठी एवढी धडपड करून तिने लग्नानंतर अभिनयाला रामराम केला.

ही अभिनेत्री दुसरी तिसरी कोणी नसून गीता बसरा आहे. २०१५ मध्ये हरभजन सिंगने बॉलिवूड अभिनेत्री गीता बसरासोबत लग्न केले. गीता बसरा चित्रपटांमध्ये काम करायची आणि हरभजनला ती खूप आवडायची. हरभजन सिंगशी लग्नानंतर अभिनेत्रीने इंडस्ट्रीपासून दूर झाली.खरंतर, २००७ च्या टी-२० विश्वचषकातील विजयानंतर गीताने हरभजन सिंगला मेसेज करून विजयाबद्दल अभिनंदन केले होते. यानंतर हरभजन सिंगने गीताला आयपीएल पाहण्याचा प्रस्ताव पाठवला. पण ती आली नाही. त्यानंतर त्यांची मैत्री झाली. काही दिवसांनी दोघेही भेटू लागले आणि त्यांच्यातील जवळीक वाढली. जेव्हा हरभजनने गीताला प्रपोज केले तेव्हा गीता त्यासाठी तयार नव्हती. तिला तिच्या करिअरची काळजी वाटत होती आणि तिने हरभजनला नकार दिला.

नंतर गीताला वाटले की तिला हरभजनपेक्षा चांगला जीवनसाथी सापडणार नाही, म्हणून तिने २०१५ मध्ये लग्नाला होकार दिला.

## जागतिक वन्यजीव दिन

आज ३ मार्च, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा केला जातो. वन्यजीवांची शिकार थांबवून वन्यजीव प्रजातींचे संवर्धन करणे हा या दिना मागिल मुख्य उद्देश आहे. १९७० च्या सुमाराला वन्यजीवांची शिकार, त्यांची तस्करी याचे प्रमाण वाढू लागले होते. हे प्रमाण इतके वाढले की त्यापैकी बरेचसे वन्यजीव कायमचे नष्ट होतात की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. याबाबत जागृती करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने ( युनो ) वन्यजीव दिवस साजरा करण्याचे ठरवले. यादिवशी वन्यजीवांचे रक्षण त्यांचे संवर्धन आणि निसर्ग साखळीतील त्यांचे महत्व आदी विषयांवर जनजागृतीचे कार्यक्रम केले जातात. नामशेष होण्याच्या धोका असलेल्या वन्य सृष्टीच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर बंधन आणणारा कायदा ३ मार्च १९७३ रोजी ८० देशांनी मान्य केला म्हणून या दिवसाला महत्व आहे. वन्यजीवांची शिकार तसेच त्यांच्या आणि दुर्मिळ वनस्पतींचा चोरटा व्यापार ही मोठी समस्या बनली आहे. केवळ भारतातच नाही तर जगभरात ही मोठी समस्या बनली आहे. एककिडे जंगले कमी होत आहे तर दुसरीकडे शिकार आणि तस्करीमुळे वन्यजीव नामशेष होत आहे. निसर्गाच्या समृद्ध परंपरेचा केंद्रबिंदू म्हणजे वन्यजीव. बंगालचे वाघ, आशियातील एकशिंगी गेंडे, भारतीय मोर आणि अशा इतर वैशिष्ट्यपूर्ण वन्यजीवांचे सुरक्षित वसतिस्थान म्हणजे जंगल. पण आता याच जंगलावर मानवाने अतिक्रमण केल्याने या वन्यजीवांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. हत्ती, गेंडा आणि वाघ हे जंगलातील मुख्य वन्यजीव आहेत. निसर्ग साखळीत या वन्यजीवांचे महत्व अनन्यसाधारण आहे पण हस्तिदंत, गेंड्याचे शिंग आणि वाघाच्या शरीरातील विविध अवयव यांच्या चोरट्या व्यापाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. जगभरात या व्यापारातून दरवर्षी ३५ हजार ते ७० हजार कोटी रुपयांची उलाढाल होत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. गेल्या ४० वर्षात जगभरातील अर्धे वन्यजीवन धोक्यात आले आहे. वन्यजीवांचा अधिवास धोक्यात येणे, वन्यजीवांची शिकार त्यांची तस्करी अशा अनेक कारणाने वन्यजीवांची संख्या कमालीची घटली आहे. हस्तिदंतासाठी आजवर १ लाख आफ्रिकन हत्ती शिकार झाले आहेत. खवले मांजर हा जगातील सर्वाधिक मारला जाणारा सस्तन प्राणी ठरला आहे. मागील दहा वर्षात गेंड्याच्या शिकारीत कैक पटीने वाढ झाली आहे. वन्यजीवांच्या तस्करीमुळे कायदा आणि सुरक्षा व्यवस्था, गुन्हेगारी टोळ्यांचा निधी यासारखे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहे. वन्यजीवांची शिकार तसेच त्यांच्या आणि दुर्मिळ वनस्पतींचा चोरटा व्यापार स्थानिकांच्या मदतीशिवाय होणे शक्य नाही. त्यामुळे असे होऊ नये यासाठी त्यांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. निसर्गाच्या साखळीतील प्रत्येक घटक किड्यांपासून ते हत्तीपर्यंत पृथ्वीवरील जीवसृष्टीसाठी महत्वाचा आहे. ही बाब सर्वानी ध्यानात घेतली पाहिजे. जगातील एकूण लोकसंख्येपैकी ३० टक्के लोकसंख्या तरुण आहे. विशेष म्हणजे भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ६० टक्के लोकसंख्या तरुण आहे. म्हणून वन्यजीव संरक्षण व संवर्धन करण्यात तरुणांचा सहभाग अतिशय महत्वाचा आहे. तरुणांना वन आणि वन्यजीवांचे महत्व समजावून सांगावे त्यासाठी शाळा कॉलेजमध्ये जाऊन त्यांचे प्रबोधन करावे. तरुणांच्या हातात त्या त्या देशाचे भविष्यच नसून जगभरातील सर्व वन्यजीवांच भविष्य त्यांच्याच हाती आहे. सरकारनेही वन्यजीवांची शिकार करणारे व त्यांची तस्करी करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी. जंगलतोड होऊ नये यासाठी उपाय योजावेत. वन्यजीवांचे संरक्षण करणे ही आपली जबाबदारी नसून कर्तव्य आहे.

# बुलढाणा जिल्ह्यात ‘जिवंत सातबारा मोहीम’

## वारसांना सातबारावर नोंदणी करण्याची संधी १ ते ३१ मार्चपर्यंत कालबध्द कार्यक्रम चिखली तहसीलचा उपक्रम जिल्हास्तरावर

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यात तहसीलदारांनी राबविलेल्या जिवंत सातबारा मोहिमेची जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दखल घेत ही मोहीम संपूर्ण जिल्ह्यात राबविण्याचे निर्देश दिले आहेत. याबाबतचे परिपत्रकही जारी करण्यात आले आहे.

महसूल विभागाच्या १०० दिवस कृती कार्यक्रम आराखड्यांतर्गत १ मार्चपासून जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये या मोहिमेंतर्गत सातबारावरील मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. मयत खातेदार यांच्या वारसांना शेत जमिनीच्या अनुषंगाने विविध दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रामध्ये वारसांची नोंद विहित कालावधीत अधिकार अभिलेखामध्ये नोंद न झाल्याने अडचणींना सामोरे जावे लागते. या दृष्टीकानातून या मोहिमेंतर्गत मयत खातेदारांच्या वारसाची नोंद करण्यात येणार आहेत.

या मोहिमेअंतर्गत कालबध्द कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

### कालबद्ध कार्यक्रमानुसार प्रक्रिया

१ ते ५ मार्च दरम्यान ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी त्यांच्या साझा अंतर्गत येणाऱ्या मयत खातेदार यांची यादी तयार करणे. ६ ते १५ मार्च दरम्यान वारसासंबंधी आवश्यक कागदपत्रे ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्याकडे सादर करणे व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी स्थानिक चौकशी करुन मंडळ अधिकारी यांचे मार्फत वारस ठराव मंजूर करणे. १६ ते ३१ मार्च दरम्यान ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी वारस फेरफार तयार करुन मंडळ अधिकारी यांनी वारस फेरफार मंजूर करणे.

### ई-हक्क प्रणालीद्वारे अर्ज प्रक्रिया

यासोबतच, अर्ज प्रक्रिया पारदर्शक आणि सोपी करण्यासाठी ई-हक्क प्रणालीचा उपयोग करण्यात येणार आहे. तसेच या कालबध्द कार्यक्रमात संबंधित तहसीलदारांना मोहिमेचे नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली असून, त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात ही मोहीम वेळेत पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

### ही कागदपत्रे आवश्यक

खातेदाराचा मुळ किंवा प्रमाणित मृत्यू दाखला, सर्व वारसांच्या वयाच्या पुराव्याची साक्षांकित प्रत, सर्व वारसांच्या आधारकार्डची साक्षांकित प्रत, वारसाबाबत विहित नमुन्यातील शपथपत्र, स्वयंघोषणापत्र, अर्जातील सर्व वारसांचा पत्ता, भ्रमणध्वनी यांचा पुराव्यासह तपशील आवश्यक आहे.

### नागरिकांना अर्ज करण्याचे आवाहन

ही विशेष मोहिम वारसांना शेतजमिनीशी संबंधित हक्क मिळवण्यासाठी मदत करेल. त्यामुळे ज्या वारसांची नोंद अद्याप सातबारावर झालेली नाही, त्यांनी मुदतीत अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# घटनांवरुन गृह खात्याच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह

## कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची पत्रकार परिषद टिका

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी : मागच्या काही घटनांवरुन असे वाटते की, गृह विभाग घाशीराम कोतवाल चालवत आहे. का असा प्रश्न निर्माण झाला आहे. अशी टिका कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बुलढाणा येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये केली.**

यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, कायदा सुव्यवस्था राहिली नाही, मुक्ताईनगरध्ये जी घटना घडली संतापजनक आहे.त्याचा निषेध करतो. मंत्र्यांना पोलिस स्टेशनमध्ये जावे लागते.आता तरी गृहमंत्र्यांनी तोंड उघडावे. त्याची जबाबदारी घ्यावी, पूर्णवेळ गृहमंत्र्यांनी राज्याला द्यावा, गृह राज्यमंत्री बेताल वक्तव्य करतो. एकामागे एक घटना घडत आहेत. कायदा सुव्यवस्थेची वाट लागली आहे.

राज्यातील महिलांची सुरक्षा धोक्यात आली आहे. याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांनी स्वीकारावी. केस गळती प्रकरणी प्रशासनाने दौरे केले आहेत. आरोग्य मंत्री यांनी देखील पाहणी केली भेट दिली. यांच्यामार्फत शोध लागेल याची अपेक्षा होती.मात्र, काही शोध लागला नाही. पालकमंत्री काही बोलले नाही. प्रशासनाने काही केले नाही. मात्र, डॉ. हिंमतराव बावस्कर यांनी त्याचा शोध लावला आहे. त्यांनी स्वतःच्या खर्चाने आले आणि चौकशी केली.



तेथील गव्हाची तपासणी केली असता त्यात काय आढळले ती सूचना प्रशासनाला दिली.मात्र, बावस्कर यांची टिंगल टवाळी करण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांनी डॉक्टरांचा अहवाल खोटा असल्याचे सिद्ध करावे, आव्हान आहे, त्यांना. मंत्री महोदयांचा सार्वजनिक वितरण प्रणाली हा आवडीचा विषया आहे. त्यामुळे ते पाठराखण करत असतील तर, त्यांनी हा गांभीर्याने हा विषय घ्यावा, आणि न्याय द्यावा. गहु च लॉट पास करणारे जे असतील त्यांच्यावर कारवाई करावी, उमेश फदाट हत्या प्रकरण बुलढाणा मध्ये काही आका आहेत. अवैध धंदे वाले,अवैध रेती वाले, अवैध तस्करी थांबवण्यासाठी तहसीलदारांनी नाली खोदली. मात्र, बुलढाणा मधील आक्का ने पुन्हा दाबली. अवैध रेती तस्करी करणाऱ्या गाड्यावर छावा लिहिले असून हा संभाजी महाराजांचा अपमान आहे. टोळीयुद्ध होऊ नये हे पोलिसांनी पाहावे. हप्ते वाढीसाठी विधानसभेत आवाज उठवला, आणि काही दिवस वारली बंद राहिले. बुलढाण्याचे वासेपुर करायचे आहेत का? जिल्हाधिकारी यांनी प्रसिद्धीसाठी केल्याचा आरोप केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी गांभीर्याने पाऊल उचलायला पाहिजे होती. हे सरकार तीन इंजिन चे सरकार आहे. तीन तिघडा काम बिघाडा असे झाले आहे.

प्रतापराव जाधव माझेही खासदार आहेत.त्यांनी माझ्याविषयी असे बोलूनये, सद्भावना यात्रा मी मस्साजोग येथून काढली होती. कोणत्याही आरोपीचा जात धर्म पक्ष नसतो. तुमच्या पोलिसांचा धाक नाही याचे काय? कोणत्याही पक्षाचा असेल हरकत नाही. तो त्याची किंमत चुकवेल. आमदार गायकवाड यांनी अवैध धंदे संदर्भात विधानसभेत आवाज उठवून कारवाई झाली नाही. कदाचित मांडवली झाली असेल. मांडवली काय जनतेसमोर यावी. उद्या शेतकऱ्यांच्या प्रश्नां संदर्भात राज्यभर कॉंग्रेस चे आंदोलन होणार आहे. ते आत कॉंग्रेस चे काम करतील, अशी अपेक्षा नाही.ज्यांनी कॉंग्रेस पक्ष विरोधात काम केले त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई होईल. असे मत कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### सैन्यात भरतीचे आमिष दाखवून फसविणाऱ्याला अटक, पुणे पोलिसांसह सैन्यदलाच्या गुप्तचर विभागाची कारवाई

**पुणे/प्रतिनिधी :** सैन्यदलाच्या दक्षिण कमांड आणि पुणे शहर पोलिसांच्या मिलिटरी इंटेलिजेन्स (एमआय) युनिटनं केलेल्या एकत्रित प्रयत्नांमुळे सैन्य भरतीच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्या एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितलं. नितीन बालाजी सुर्यवंशी असे संशयित आरोपीचं नाव आहे.

सैन्यदलात नोकरी लावतो, असे सांगून फसवणूक करणारा संशयित आरोपी हा लातूर जिल्ह्यातील रहिवासी आहे. त्याला शनिवारी पुण्यातील दक्षिण कमांड मुख्यालयाजवळ अटक करण्यात आली, अशी माहिती वरिष्ठ पुणे पोलीस अधिकाऱ्यानं दिली. पोलीस अधिकाऱ्याच्या माहितीनुसार, सुर्यवंशीनं महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या उमेदवारांना हेरलं होतं. त्यांना सैन्यात भरतीचं आमिष दाखवून प्रत्येक उमेदवाराकडून तीन लाख रुपये उकळले होते. त्यानं अंदाजे ५-१० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. नांदेड जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या २३ वर्षीय उमेदवाराची फसवणूक झाली होती. त्यानं नोकरी लागेल, या आशेनं आरोपीला १.७५ लाख रुपये दिले होते. त्याच्या तक्रारीनंतर ही अटक करण्यात आली.

### अवैध पाणी उपसा करुन पाणी वापरणाऱ्या एम.आय. डी.सी मालकावर कारवाई करण्याचा पाटबंधारे विभागच्या अधिकाऱ्यांचा इशारा



दैनिक आपला विदर्भ

**जालना /प्रतिनिधी :** जालन्याच्या कुंभेफळ येथील विहिरीतून अवैध पाणी उपसा केला जात असल्याची बाब उघडकीस आलीय. अवैधरित्या पाण्याची चोरी करून सदरील पाणी एम. आय. डी. सी ला पुरवठा केल जात असल्याचा आरोप कुंभेफळ येथील ग्रामस्थांनी केलाय.

दरम्यान, विहिरीतून अवैध पाणी उपसा होत असल्याचं समजताच कुंभेफळ येथील ग्रामस्थांनी याची माहिती जालना तहसील आणि पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. यावेळी तहसील आणि पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी करत अवैध पाणी उपसा करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मोटारी पाटबंधारे विभागाकडून जप्त करण्यात येऊन अवैध पाणी वापरणाऱ्या एम.आय.डी.सी. मालकावर कारवाई करण्याचा इशारा पाटबंधारे विभागच्या अधिकाऱ्यांनी दिलाय.

दरम्यान, यावेळी कुंभेफळ येथील ग्रामस्थांचा मोठा जमाव जमला होता. यावेळी बोलताना कुंभेफळ च्या सरपंचांनी विहिरीतून होत असलेला अवैध पाणी उपसा थांबवण्याची मागणी केलीय. कुंबेफळ येथील सध्या मृत पाणी साठा शिल्लक असून याबाबत कुंभेफळ येथील ग्रामस्थांनी सिंचन विभागाला वारंवार निवेदन देऊन अवैध पाणी उपसा थांबवण्याची मागणी केली. मात्र, याबाबत सिंचन विभागाने कोणतीही कारवाई केली नाही त्यामुळे नागरिकांनी आक्रमक होत आवाज पाणी उपसा बंद न झाल्यास उपोषणाला बसण्याचा इशारा दिला.

# महाराष्ट्र राज्यातील महसूल सेवकांना चतुर्थ श्रेणीचा दर्जा द्या

## महाराष्ट्र राज्य महसूल सेवक संघटना यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

■ महेबूब शेख

**उमरखेड :** २२ फेब्रुवारी रोजी महसूल मंत्री महाराष्ट्र चंद्रशेखर बावनकुळे उमरखेड येथे आले असता महाराष्ट्रराज्य महसूल सेवक संघटना यांनी, महसूल सेवकांना न्याय मिळावा, प्रलंबीत मागण्या शासनाने विना विलंब मंजुर कराव्यात याकरीता महाराष्ट्र राज्याच्या शोषणाविरुद्ध संघटनेद्वारे निवेदन दिले.

यात त्यांनी महसूल सेवकांना व अल्पशा मानधनावर आपल्या कुटुंबाची जबाबदारी या महागाईच्या काळात करणे अशक्य आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील महसूल सेवकांना चतुर्थ श्रेणी दर्जा देण्याचे नमूद केले आहे.



यावेळी महसुल सेवक अध्यक्ष अभिलाष,उपअध्यक्ष - गोपाल काळबांडे,म. से. सचिव - संघ जिया वाघमारे,म. से. से. ईबादुल्ला से. उमर व मा से. गोस्वामी उपस्थित होते.

# लोणार येथे आ. संजय गायकवाड यांचा नागरी सत्कार संपन्न

दैनिक आपला विदर्भ

■ अबुतालीब खान

**सुलतानपूर :** विकास पुरुष धर्मवीर आमदार संजयजी गायकवाड यांचा लोणार येथील समस्त मापारी परिवार व सर्व धर्मीय समाज बांधवाच्या वतीने भव्य नागरी सत्काराचे आयोजण स्थानिक वाल्मिकी सभामंडप येथे दि. १ मार्च रोजी करण्यात आले होते. यावेळी सत्काराला उत्तर देताना आ. गायकवाड म्हणाल.. प्रत्येकाच्या सुखा दुःखात धावून जाऊन जातीधर्म कधी पहिला नाही त्याना मदतीचा हात दिला.७० वर्षात जो विकास झाला नाही तो ५ वर्षात केला.छत्रपती शिवाजी महाराजाचे भारतातील दुसऱ्या नंबरचे मंदिर बुलढाणा शहरात बांधले. सर्व महापुरुषाचे मनमोहक पुतुळे शहरात उभारले आज अभिमानाने बुलढाणा नाव समोर येताच आमदार संजय गायकवाड असे नाव समोर येते.ग्रामीण भागातील विदयार्थ्यांना शिक्षण



पाहिजेत तसे मिळत नाही म्हणून नगर परिषद शाळेत सिबीएससी सुरु केली. मी सुरुवातिला विधानसभा निवडणूक लढविली तेव्हा पराभूत होताच विरोधक म्हणायचे संजय गायकवाड संपला हे शब्द कानावर पडले कि मी परत उठून उभा राहायचो. . मुस्लिम समाज बांधवानी शादीखाना सोडून मुलाच्या भविष्यासाठी मुलांना नोकऱ्या, रोजगार जो राजकीय पक्ष



देईन त्याच्या पाठीमागे उभे राहावे वरून येणाऱ्या फतव्यावर मतदान करू नये.असे आव्हानही केले तसेच यापूढे ही जनतेचा सेवक म्हणून समाजाच्या रक्षणासाठी सामाजिक कार्य करीत राहील असे आ. संजयजी गायकवाड यांनी सांगलीतले यावेळी व्यासपीठा वर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉं. खुशालराव मापारी, पृथ्वीराज गायकवाड, कुणाल गायकवाड, इम्रानखान, राजेश माधवराव मापारी, भुषण मापारी, शैलेश कुलकर्णी, अनिल शेळके, ओम शर्मा, डॉं. अनिल मापारी, डॉं. विक्रांत मापारी, नितीन शिन्दे, बिलालसेठ कुरेशी, जहूरुदिन चौधरी, आबेदखान, गुलाब सरदार, राजेश इंगळे, गुलाब माद नकर, छोटू नेवरे,संजय मादनकर, संजय राजगुरू, कैलास मापारी, नितीन हुंबाड, रवींद्र मापारी, ताहेरभाई, बब्बीभाई, फिरदोस पठाण, हाशमसेठ, गजानन मापारी, अरविंद मापारी, गजानन गायकवाड, शाम राऊत, विठल जाधव, पत्रकार यांच्यासह सर्व धर्मीय समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

विविध वृत्त...

### अकोट तालुक्यात मोठ्या प्रमाणात होते संत्र्याची लागवड.. मात्र, मृग संत्र्याच बहार यंदा धोक्यात





दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** आता बातमी आहे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची चिंता वाढवणारी. अकोला जिल्हातल्या अकोट तालुक्यात संत्रा उत्पादक शेतकरी मोठ्या चिंतेत आला आहे.... तर अकोट तालुक्यात संत्रा पिकावर देठसुकी नावाचा रोगामुळे संत्रा पिकाला मोठी गळती सुरू आहे... त्यामुळं शेतकऱ्यांना खर्च निघण कठीण झाला आहे... तर अनेक शेतकऱ्यांचे एकरी ६५ टक्के पीक धोक्यात आले आहे.... त्यामुळं शेतकऱ्यांच्या अडचणीत प्रचंड वाढ झाली आहे.... तर मागील हंगामात हेक्टरीमागे १५ लाखाच उत्पन्न झालं होत... मात्र, यंदा केवळ देठसुकी नावाच्या रोगामुळे हेक्टरी ६१ हजार रुपयांच संत्र्याचे उत्पन्न शेतकऱ्यांच्या हाती आल आहे....तर प्रत्येकी झाडातून ६५ टक्के उत्पन्न वाया जात आहे...त्यामुळे अकोट तालुक्यातल्या ऐदलापूर शेतशिवारातील संत्रा गळतीचे हे भयावह दृश्य सध्या पहायला मिळत असून केवळ पस्तीस टक्के उत्पन्न हाती येत असून त्याला भाव अपेक्षाप्रमाणे नसल्याच शेतकरी सांगतात....तर ज्या शेतात गाडी जाते, तिथेच कृषी अधिकाऱ्यांची भेट

### देवळी येथील औद्योगिक वसाहतीतील एसएमडब्ल्यू इस्पात कंपनीच्या कामगारांचे धरणे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** देवळी येथील औद्योगिक वसाहतीतील एसएमडब्ल्यू इस्पात कंपनीच्या कामगारांनी आपल्या विविध मागण्यांसाठी कंपनी समोर संभाजी बिग्रेडच्या नेतृत्वात आंदोलन सुरू केले आहे. कामगारांना किमान वेतनाप्रमाणे वेतन मिळावे, कामगारांची ड्युटी आठ तासांची असावी यासह विविध मागण्यासाठी आंदोलन करण्यात येत असून मागण्या मान्य होई पर्यंत आंदोलन सुरू राहणार असल्याचे इंजिनियर तुषार उमाळे प्रदेश संघटक संभाजी बिग्रेड यांनी सांगितले.

### जालना ते खामगाव रेल्वे मार्ग मंजूर असून , सरकारकडून अद्याप निधी नाही



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :**जालना रेल्वे संघर्ष समितीच्या वतीनं बैलगाडी रॅली काढण्यात येणार आहे..जालना ते खामगाव हा रेल्वे मार्ग केंद्र आणि राज्य सरकारनं मंजूर केलेला आहे. मात्र अद्याप या मार्गासाठी सरकारनं अद्याप निधी दिलेला नाहीये.. त्याचबरोबर जालना ते पटनासाठी नियमित रेल्वे सोडण्यात यावी. यासाठी जालना ते खामगाव रेल्वे मार्गात येणार्या गावांमध्ये बैलगाडी रॅली काढण्यात येणार असल्याचा निर्णय

